# बृहन्मुंबई महानगरपालिका

## ई-दरपत्रिका

**क्रमांक :- सआकेपू/ २००६ /सअ(परि.1)/जन. दिनांक: २३.०८.२०२४**

सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
के/पूर्व विभाग कार्यालयीन इमारत,
खोली क्र. १०१ पहिला माळा, आझाद रोड,
गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुबंई-४०००६९.
दु. क्र. २६८३७१०४ विस्तारित क्रं. ३२८

के/पूर्व विभागातील सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांच्या मंजूरीनुसार खाली दर्शविलेल्या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यता प्राप्त संस्था / कंत्राट्दारांकडून तातडीच्या कामासाठी, तात्काळ निविदा / दरपत्रिका मागविण्यात येत आहेत. मान्यताप्राप्त इच्छुक संस्था / कंत्राट्दारांनी दिनांक २३/०८/२०२४ ते २६/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत दूसरा मजला, मुख्य लिपिक (व्यय), के/पूर्व विभाग यांजकडून रु.३००/- अधिक वस्तू व सेवा कर (GST) इतकी रक्कम भरून निविदा / दरपत्रिका फॉर्म खरेदी करण्यात यावा.

इसारा अनामत रक्कम (EMD) रु.६०००/- DD/CASH द्वारे भरून त्याची पावती निविदा / दरपत्रिकेच्या लिफाप्या सोबत जोडण्यात यावी व मुख्य लिपिक (व्यय) के/पूर्व विभागातील निविदा / दरपत्रिका पेटीमध्ये मोहरबंद निविदा / दरपत्रिका लिफाफा टाकण्यात यावा व तो लिफाफा दिनांक २६/०८/२०२४ त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता किंवा त्यानंतर उघडण्यात येईल.

तसेच मोहरबंद निविदा / दरपत्रिका स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संपूर्णपणे मा. सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली स्थळ निविदा/ दरपत्रिका स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | **के/पूर्व विभागातील प्रभाग क्र. ८५ मधील डॉ. केशव बळीराम हेडगेवार मैदान, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७ येथील कृत्रीम तलावात आगामी गणपती विसर्जन-२०२४ करिता आवश्यक प्रत्येकी १००००.०० लिटर क्षमतेचे पाण्याचे टँकर पुरविणेबाबत.** | **रु.२,८०,३६८.००/-<br>(वस्तू व सेवा कर सहित)** |

आगामी गणपती उत्सव दिनांक ०७/०९/२०२४ ते १७/०९/२०२४ दरम्यान असुन विसर्जनाच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

दिनांक ०८/०९/२०२४, ०९/०९/२०२४, ११/०९/२०२४, १३/०९/२०२४, आणि १७/०९/२०२४.

सदर स्थळ निविदेमध्ये काही बदल झाल्यास सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभागातील सुचना फलकावर लावण्यात येईल.

सही/-

सहाय्यक अभियंता (परिरक्षण-१) के/पूर्व विभाग